अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारावरुन सदर मिळकतीवर इमारत बांधणे व इमारतीतील बांधीव भाग विक्री करणे हे अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्याअन्वये सदर मिळकतीचे घोषणापत्र आम्ही मा.दु.नि.सो, अमळनेर यांचे समोर दस्त क्रमांक ----- दिनांक / /२०१ अन्वये नोंदणी केलेले आहे.

२) परिशिष्ठ १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर करावयाचे बांधकामाचे नकाशे आम्ही तयार केले. ते बांधकाम नकाशे अमळनेर नगरपरिषद अमळनेर कडील बांधकाम परवानगी जावक नंबर वशी १३/१०६७ दिंनाक २०/१२/२०१६ अन्वये मंजुर करण्यात आले आहे.त्यानुसार सदर मिळकतीवर आम्ही बांधकाम केलेले आहे. आम्ही इमारतीतील निवासी जागा/व अनिवासी जागा फ्लॅट, गाळे धारक / दुकान धारक यांचे संबंधांत वेगवेगळे करारनामे /खरेदीखत संबंधीत जागा खरेदी घेणार यांचे लाभांत लिहुन देत आहोत.

त्याचप्रमाणे निवासी जागा धारकांना ज्या काही मर्जिनल स्पेस स्वतंत्रपणे विकल्या जातील त्यामध्ये इतर अनिवासी भाग धारकांचा अथवा दुकान/ गाळे धारकांचा काहीएक हक्क अगर अधिकार राहणार नाही.

३) परिशिष्ठ १ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या इमारतीतील बांधीव भाग विकत घेण्याची तुम्हांस इच्छा झाल्याने तुम्ही आमचेकडे कागदपत्रांची पाहणी करण्यासाठी म्हणून कागदपत्रे मागितले. त्याप्रमाणे बांधकामाचा प्लॅन, बांधकामाची परवानगी, मिळकतीचा सि स उतारा, टायटल सर्टीफीकेट हे सर्व व इतर संबंधीत कागदपत्रे आम्ही दाखविले. तसेच सदरच्या नकाशापैकी तुम्हांस परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेल्या जो बांधीव भाग द्यावयाचा आहे त्या भागाच्या नकाशाची एक प्रत जोडली आहे. त्यामध्ये तुम्हांस जो बांधीव भाग आमचे कडून खरेदी करावयाचा आहे. तो भाग लाल रंगाने दर्शवून दिला आहे. तुमचे व आमचे दरम्यान तुम्हांस जो बांधीव भाग खरेदी करावयाचा आहे त्या संबंधी बोलणी झाली व तुम्ही आमचे बरोबर व्यवहार ठरविला. तुमचे व आमचे दरम्यान खरेदीखताच्या शर्ती व अटी ठरल्या. प्रस्तुत खरेदीखताच्या शर्ती व अटी तुम्ही व आम्ही मान्य कबूल करुन लिहून ठेवित आहोत. तसेच तुम्ही खरेदी करणार असलेली जागा एकूण इमारतीपैकी एक भाग आहे. तुम्ही खरेदी करणार असलेल्या भागाची नासधुस झाल्यास, नुकसान झाल्यास संपूर्ण इमारतीचे नुकसान होणार असल्यामुळे तुम्ही जागा वापरासंबंधी व तदंगनुषंगीक काही गोष्टी कबूल केल्या. सबब त्या गोष्टी देखील तुम्ही व आम्ही प्रस्तुत खरेदीखताने लिहुन ठेवीत आहोत.

४) आम्ही विकसीत केलेल्या मिळकतीचे वर्णन परिशिष्ठ – १ यांत दिले आहे. तुम्हांस जो बांधीव भाग खरेदी द्यावयाचा आहे. त्याचे वर्णन परिशिष्ठ –२ मध्ये दिलेले आहे. इमारत ज्या प्रकारची बांधली जाणार आहे. त्या बद्दलची स्पेसिफिकेशन्स परिशिष्ठ – ३ यांत दिली आहेत. त्याप्रमाणे इमारत बांधण्यासाठी आम्ही जी स्पेसिफिकेशन्स वापरले आहेत ती तुम्ही कबूल केलेली आहेत. या खरेदीखतात परिशिष्ठ – ४ यामध्ये सामाईक खर्चाची बाबी नमूद केलेल्या आहेत. त्या सामाईक खर्चाची बाबी मध्ये अथवा अन्य ज्या गोष्टी सर्व खरेदीदारांच्या हितासाठी करणे भाग पडेल त्या खर्चामध्ये तुम्ही हिस्सेराशीने खर्च देण्याचे कबूल केले आहे. तसेच आमचे मालकी हक्काबद्दल तुम्ही खात्री करुन घेतलेली आहे. त्या बाबत तुमचे मनांत कुठलीही शंका राहिलेली नाही.

५) प्रस्तुत खरेदीखताविषयी असलेली मिळकत परिशिष्ठ – २ मध्ये नमूद केली आहे. या खरेदीखतात नमुद केल्याप्रमाणे वर्तन तुम्ही केले तरच सदर जागे संबंधी तुम्हांस हक्क प्राप्त होतील.